# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ८३०/२०२२

तक्रारकर्ता, श्री.संदिप बाळकृष्ण पाटील
मु.कळमखांड, पो.कंचाड
ता.वाडा, जि.पालघर ४२१ ३०३

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय कळमखांड
ता.वाडा, जि.पालघर

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय कळमखांड
ता.वाडा, जि.पालघर

**तक्रार सुनावणीचा दिनांक : ४/८/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ६/१२/२०२१ | ---- | ११/१/२०२२ | १०/२/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२०/४/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ४/८/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्त्याचे प्रतिनिधी अॅड. सोमनाथ मोहन गायकवाड उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती पल्लवी चौधरी, ग्रामपंचायत अधिकारी कळमखांड व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.के.के.भोईर, सध्या कार्यरत- ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत देवघर, ता.वाडा जि.पालघर उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *सन २०१६ ते आजतागायत पेसा अंतर्गत झालेल्या कामांची माहिती*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१०/२/२०२२ रोजी, " *सुनावणीचे वेळेस अपिलकर्ते यांनी माहितीचा अधिकारात अर्जात नमूद केलेली १) १४ वा वित्त आयोग २) ५ % पेसा ३) ------ कामाच्या निविदा/टेंडर्स जाहिरात, अंदाजपत्रक, एम.बी/मुल्यांकन, व्हौचर, सक्षमतेचा दाखला, नोंदणीकृत ठेकेदाराची माहिती दि.२१/२/२०२२ रोजी देण्याचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्राम पंचायत कळमखांड यांनी मान्य केले असून सदर माहिती त्यांना विनामूल्य देण्यात यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, ते १५ दिवसात तक्रारकर्ता यांना माहिती देतील. जन माहिती यांच्या या निवेदनाची नोंद घेण्यात आली.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे. सदर कालावधीत माहिती प्राप्त न झाल्यास तक्रारकर्ता यांनी ही बाब आयोगाच्या निदर्शनास आणण्याची मुभा असेल.
२. तत्कालिन जन माहिती अधिकारी १) श्री.के.के.भोईर, २) श्रीमती जिज्ञा भोईर व ३) श्रीमती पल्लवी चौधरी, ग्रामपंचायत अधिकारी कळमखांड यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ६/१२/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येकी प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे

सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१७/९/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

सही/-
(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ ऑगस्ट, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी १) श्री.के.के.भोईर, २) श्रीमती जिझा भोईर व ३) श्रीमती पल्लवी चौधरी, ग्रामपंचायत अधिकारी कळमखांड -- **यांना प्रत** --

-- गट विकास अधिकारी,
पंचायत समिती वाडा, राजीव गांधी चौक,
तहसिल कार्यालयाच्या शेजारी,
ता.वाडा जि.पालघर **यांचेमार्फत रवाना.** (गट विकास अधिकारी यांनी सदरची प्रत संबंधित अधिकारी यांना तात्काळ बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)

## विवेचन

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.के.के.भोईर सध्या कार्यरत-ग्रामपंचायत अधिकारी देवघर ता.वाडा अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती पल्लवी चौधरी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कळमखांड उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती जिझा भोईर खुलासा केला की, तक्रारकर्ता यांनी माहिती अर्जामध्ये चार अर्जाची माहिती मागीवली होती. परंतु श्री.कुंदन भोईर, ग्रामपंचायत अधिकारी यांनी ग्रामपंचायतीचा चार्ज देतेवेळी सदरील चार (तक्रार क्र.८२७/२०२२, ८३०/२०२२, ८३१/२०२२, ८३२/२०२२) प्राप्त माहिती अधिकार अर्जाबाबत कोणतीही कल्पना न दिल्याने संबंधितांना माहिती देण्यास उशिर झाला होता. तरी दि.४/८/२०२२ रोजीच्या सुनावणी आदेशानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती दिली आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती पल्लवी चौधरी यांनी खुलासा केला की, त्यांना श्री.कुंदन भोईर व श्रीमती जिझा भोईर यांनी चार्ज देतेवेळी सदरील चार (तक्रार क्र.८२७/२०२२, ८३०/२०२२, ८३१/२०२२, ८३२/२०२२) प्राप्त माहिती अर्जाची कल्पना न दिल्याने संबंधितांना माहिती देण्यास उशिर झाला होता. आता ८/९/२०२५ रोजी जलद पोस्टाने माहिती दिली आहे.

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.कुंदन भोईर यांनी खुलासा केला की, तक्रारकर्ता यांनी दि.६/१२/२०२१ रोजी माहिती अर्ज दाखल केला होता. सदरची माहिती मुदतीत देणे ग्रामपंचायतीला क्रमप्राप्त होते. तथापि या अर्जातील माहिती व्यापक स्वरूपाची असल्याने तसेच माहिती अधिकाराची असल्याने, ग्रामपंचायतीकडे पुरेसे मनुष्यबळ माहिती काढण्यासाठी उपलब्ध नसल्याने (ग्रामपंचायतीकडे फक्त १ शिपाई आहे) सदर माहिती मुदतीत अर्जदार यांना देता आली नाही. सद्यस्थिती आयोगाच्या आदेशानुसार ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती तक्रारकर्ता यांना दिली आहे.

श्रीमती जिझा भोईर व श्रीमती पल्लवी चौधरी यांचा खुलासा लक्षात घेता त्यांचेकडे श्री.के.के.भोईर यांनी कार्यभारात माहिती अर्ज दिलेले नव्हते, त्यामुळे माहिती देण्याच्या विलंबाकरिता त्यांना जबाबदार धरता येणार नाही. तथापि श्री.के.के.भोईर यांनी माहिती व्यापक स्वरूपाची असल्याने देता आले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु त्यांचे हे म्हणणे मान्य केले तरी त्यांचेनंतर कार्यरत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती अर्ज हस्तांतरित का केले नाही या प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिले नाही. तसेच माहिती अधिकरात ३० दिवसात माहिती देणे बंधनकारक आहे जर तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरूपाची आहे असे श्री.के.के.भोईर यांचे मत होते तर तसे त्यांना ३० दिवसात उत्तर देणे आवश्यक होते. तशाप्रकारची कोणतीही कार्यवाही श्री.के.के.भोईर यांनी केली नाही यावरून त्यांनी जाणीवपूर्वक माहिती दिली नाही असे दिसून येते सबब त्यांचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.के.के.भोईर ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कळमखांड, ता.वाडा (सध्या कार्यरत- ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत देवघर ता.वाडा जि.पालघर) यांनी आयोगास सादर केलेला खुलासा अमान्य करण्यात येत आहे. त्यांना दि.४/८/२०२५ च्या आदेशातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु.२५०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून ५ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र. ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०० १६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करावी. या बाबतची कार्यवाही करुन (रक्कम जमा केलेल्या चलनाच्या छायांकित प्रतीसह व्दितीय अपील क्रमांक स्पष्ट नमूद करून) पूर्तता अहवाल **गट विकास अधिकारी, पंचायत समिती वाडा जि.पालघर** यांनी आयोगास सादर करावा.

२. जन माहिती अधिकारी श्रीमती जिज्ञा भोईर व श्रीमती पल्लवी चौधरी यांनी आयोगास सादर केलेला खुलासा मान्य करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२५.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

१) सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग (मुख्यालय), १३ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२) उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,
कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
३) गट विकास अधिकारी, पंचायत समिती वाडा,
ता.वाडा जि.पालघर
४) श्री.के.के.भोईर, (तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कळमखांड)
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत देवघर ता.वाडा जि.पालघर